नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 16/07/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावर चिचोली खापरखेडा येथे दिनांक 14/07/2020 चे 23.00 वा. ते 23.30 वा. दरम्यान आरोपी नामे – भागीरथ रामस्वरूप खरग्याल, रा. वार्ड क्र. 3, खापरखेडा हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात एक खंजर चाकु घेवुन गावात दहशत निर्माण करीत होता.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे– सरतर्फे सहायक फौजदार श्री. राठोड, पोस्टे. बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे . बोरी येथे आरोपिविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. राठोड हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावर वाघधरेवाडी आईस कंपनीमागे विष्णुलक्ष्मी नगर येथे दिनांक 15/07/2020 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरज उर्फ प्रकाश चंदुलाल शेंडे, वय 35 वर्ष, रा. वाघधरेवाडी विष्णुलक्ष्मी नगर, कन्हान हे दुकाना वरून घरी परत येत होते. दरम्यान आरोपी नामे क्र. 1) बच्चा उर्फ निहाल विश्वेश्वर पात्रे, रा. वाघधरेवाडी व 2) ईश्वर पात्रे, रा. वाघधरेवाडी विष्णुलक्ष्मी नगर, कन्हान हे फिर्यादीला पाहुन हसत होते त्यावेळी फिर्यादीने आरोपीतांना म्हटले की, ''मला पाहुन का हसत आहात?'' याकारणावरून आरोपीतांनी फिर्यादीला शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपिविरुध्द कलम 324, 504, 506 भा.द. वी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चौधरी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर